# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18
## अ प्रभाग समिती
## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 02]

**दिनांक : 11/06/2019** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जून 2019 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 11/06/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. बाबर शर्मिला राजू | सभापती |
| 2. | मा.अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा. केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 4. | मा. प्रमोद कुटे | सदस्य |
| 5. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 6. | मा.शौलेश उर्फ शैलेंद्र मोरे | सदस्य |
| 7. | मा. जयश्री वसंत गावडे | सदस्या |
| 8. | मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे | सदस्य |
| 9. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 10. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 11. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय श्रीमती आशादेवी दुरगुडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री ज्ञानदेव जुंधारे -मा.कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री संजय खाबडे-मा.कार्यकारी अभियंता विद्युत, श्री मोहन निकम –लेखाधिकारी, श्री लक्ष्मीकांत कोल्हे,श्री शिवाजी चौरे, श्री चंद्रकांत मुठाळ,-सर्वश्री उपअभियंता(स्थापत्य), श्री. दिपक कुंभार-उपअभियंता( पाणीपुरवठा), श्री. सुभाष काळे- उपअभियंता (जलनि:स्सारण), श्री एम.आय.खोंद्रे –उपअभियंता(झोनिपु/स्थापत्य), श्री सुनिलदत्त नरोटे,उपअभियंता(स्थापत्य् उद्यान ),श्रीमती मोमीन जहिरा, उपअभियंता(झोनिपु/स्थापत्य),श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री गायकवाड पी.एम.-उद्यान अधिक्षक(वृक्ष), श्री गिरिश गुठे, श्री. पाटील एस.पी., अशोकराव मगर,प्रताप मोरे – सर्वश्री कनिष्ठ अभियंता(स्थापत्य),,श्रीमती साळुंके अस्मिता, क.अभियंता( स्थापत्य् उद्यान) , श्री घुले संभाजी, वसुली अधिकारी, श्री पगार एस.जी., जनरेटर ऑपरेटर इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम नवनिर्वाचित सभापती मा. शर्मिला बाबर यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला तसेच सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांची विधी समिती सदस्य् पदी निवड झाली असल्याने त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला. तसेच कै.श्री सुनिल यादव, मजूर यांचे आकस्मित दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत आली. त्यानंतर मा.सभापती शर्मिला बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य/नगरसदस्या, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

तदनंतर कार्यपत्रिका क्र.११ दि. १२/०२/२०१९ रोजी झालेल्या अ प्रभाग समितीच्या विशेष (अंदाजपत्रकिय) सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

कार्यपत्रिका क्र.१२ दि. १२/०२/२०१९ रोजी झालेल्या अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

कार्यपत्रिका क्र.१ दिनांक ९/५/२०१९ रोजी झालेल्या अ प्रभाग समितीच्या विशेष (सभापती निवड) सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक:- 1 सन्मा.सभापती शर्मिला बाबर,अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.

से.२४ केदारेश्वर मंदिराचे समोरील रस्त्यास **"प्रकाश (आप्पा) शंकर मोरे"** असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

(कृ.मा.प.)

**विषय क्रमांक :- 2** सन्मा.. सभापती शर्मिला बाबर,अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.

हेडगेवार भवन येथील पार्क करत असलेली आरोग्य् विभागाची वाहने से.२३ येथील वाहतूकनगरी जवळील उद्यान या ठिकाणी पार्क करणेचे प्रस्तावास मान्यता देणे

**विषय क्रमांक :- 3** सन्मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.
श्रीधरनगर युवा प्रतिष्ठान यांचा दिनांक १/६/२०१९ रोजीचा अर्ज.
टाटा मोटर्स कंपनी (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) जवळील फुटपाथची जागा भाडेतत्वावर मिळणेबाबत.

**विषय क्रमांक :-4** सन्मा.सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.
पालखी मार्गावरील टप-या व गाडयांची अतिक्रमणे हटविणेबाबत.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 02
दिनांक 11/06/2019
सुचक: मा.केश्व हनुमंत घोळवे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलेंद्र प्रकाश मोरे

संदर्भ :- सन्मा.सभापती शर्मिला बाबर, अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.

से.क्र.२४, केदारेश्वर मंदिरासमोरील रस्त्यास **"प्रकाश (आप्पा) शंकर मोरे"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 3
दिनांक 11/06/2019
सुचक: मा अमित गावडे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ:- सन्मा. सभापती शर्मिला बाबर, अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.

हेडगेवार भवन, निगडी प्राधिकरण येथे सध्या आरोग्य विभागाची कचरा गोळा करणारी वाहने पार्किंग केली जातात त्यामुळे आजूबाजूस राहण्या-या नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होतो. यास्तव सदर ठिकाणी वाहने पार्किंग न करता ती से.२३ वाहतूकनगरी जवळील उदयानाच्या ठिकाणी पार्किंग करणेचे मूळ प्रस्तावास तसेच तेथे वाहनांच्या सुरक्षेसाठी आवश्यक गेट वा इतर सुविधा करण्याचे उपसूचनेसही मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 4
दिनांक 11/06/2019
सुचक: मा. शैलजा मोरे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ सन्मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.
श्रीधरनगर युवा प्रतिष्ठान यांचा दिनांकु १/६/२०१९ रोजीचा अर्ज.

श्रीधरनगर युवा प्रतिष्ठान यांचे दिनांक १/६/२०१९ रोजीचे पत्राचे अनुषंगाने टाटा मोटर्स कंपनी (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) जवळील जागा (अंदाजे क्षेत्र ८ फूट बाय २५ फूट) भाडेतत्वावर त्वरीत मिळणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 5
दिनांक 11/06/2019
सुचक: मा. प्रमोद कुटे

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा शिलल उर्फ विजय गोरख शिंदे

संदर्भ :- सन्मा.सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. 11/06/2019 रोजीचा प्रस्ताव.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळयाचे दिनांक २५/६/२०१९ रोजी आगमन होणार आहे. तरी पालखी मार्गावरील भक्ती शक्ती चौक ते विठ्ठल मंदिर आकुर्डी व अंतर्गत सर्व रस्ते या मार्गावरील तसेच फूटपाथवरील टप-या हातगाडया व इतर अतिक्रमणे हटविणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती, शर्मिला राजू बाबर , अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य/सदस्या, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

[ शर्मिला राजू बाबर ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/9/कावि/ 80 /2019 दि. 18/06/2019

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ------------------------